REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ | पुणें, बुधवार तारीख २ एप्रिल १९४७ | अंक १५

लोकांच्या विश्वासास पात्र झालेलें

**दी डेक्कन इंजिनिअरिंग, लिमिटेड.**

माधवनगर ( बुधगांव ) एम्. एस्. एम्. रेल्वे

नांगर —यांचे— चरक

किसान नं. १०१ ( सहा ते आठ बैली ) — विश्वास ( चार बैली )
किसान नं. १०२ ( चार ते सहा बैली ) — वासुदेव ( दोन बैली )
किसान नं. १०५ ( दोन ते चार बैली ) — राजा ( एक बैली )

' मधुकर ' ( सात फण्याचे ) कोळपें ( दोन बैली )

एजंटस्, स्टॉकिस्टस् नेमणें आहेत

**आरको**

प्रत्येकास लागणारी नित्योपयोगी वस्तू

आरको निलगिरी तेल

लक्ष्मी एजन्सी, मुंबई २४

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
—खादीचा उत्तम संच—

**खादी मन्दिर**

२६२, बुधवार पेठ,
दमडेरे बोळाजवळ,
पुणें २

पुणें—प्रदर्शनांतील स्टॉल नं. १४० पहाण्यास विसरूं नका.









## विविध माहिती

**भाताच्या पिकाखालील जमीन**—१९४६-४७ या सालीं हिंदुस्थानांत ७ कोटी, ८१ लाख, ४४ हजार एकर एवढ्या क्षेत्रांत भात शेती करण्यांत येणार आहे. १९४५-४६ सालीं हें क्षेत्रफळ ७ कोटी, ७३ लाख, ४ हजार एकर होतें, म्हणजे, चालू वर्षी क्षेत्रफळांत १ टक्क्यानें वाढ झाली आहे.

**गिरण्यांच्या कोळशांत कपात**—हिंदुस्थानांतील कोळशाच्या टंचाईमुळें कारखान्यांना पुरविण्यांत येणाऱ्या कोळशांत दोन तृतीयांशाइतकी कपात करण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार असल्याचें समजतें. ही कपात दोन किंवा तीन महिन्यांपुरतीच होण्याचा संभव आहे.

**हिंदुस्थानकडे कर्जाची मागणी**—ताग, कापूस आणि कातडी विकत घेण्यासाठी फ्रान्सनें व झेकोस्लोव्हाकिआनें हिंदुस्थान सरकारकडे कर्जाची मागणी केली आहे असें समजतें. सरकार या मागणीचा विचार करीत आहे.

**हेन्री वॉलेस यांचा विरोध**—ग्रीस आणि तुर्कस्थान यांना कर्ज देण्याबाबत अमेरिकेचे एक माजी मंत्री मि. हेन्री वॉलेस यांनीं विरोध दर्शविला आहे.

**डेन्मार्कला अमेरिकेचें कर्ज**—अमेरिकेनें डेन्मार्कला १ कोटी डॉलर्सचें कर्ज देण्याचा करार केला आहे. या कर्जाचा उपयोग अमेरिकेबाहेरील अमेरिकेची शिलकी मालमत्ता विकत घेण्यासाठीं व्हावयाचा आहे.

**मजूर सरकारची अर्थ व्यवस्था**—इंग्लंडमध्यें समाजवादी कार्यक्रमावर निवडून आलेल्या मजूर सरकारनें आतापर्यंत १५ टक्के मोठी कारखानदारी आपल्या मालकीची केली आहे. उरलेली ८५ टक्के अजून खाजगी भांडवलदारांच्याच मालकीची आहे.

**अडेलतट्टू इंग्लिश गृहिणी**—इंग्लंडमध्यें नुकतीच जळणाची टंचाई पडली होती तेव्हां हजारों इंग्लिश गृहिणींनीं दिवसा पाणी तापविण्यासाठी विजेचा उपयोग केला. दिवसा कारखान्यांना वीज पुरविता यावी म्हणून सरकारनें नागरिकांना विजेचे दिवे वापरण्याची मनाई केली होती. असें म्हणतात की, मजूर सरकारशीं असहकार करण्यासाठी वरिष्ठ व मध्यम वर्गांतील स्त्रियांनींच या मार्गाचा अवलंब केला.

**अमेरिकेंतील हिंदी विद्यार्थी**—अमेरिकेत एंजिनिअरिंगचा अभ्यास करण्यासाठी परदेशांतील ३ हजारांवर विद्यार्थी गेले आहेत. त्यांपैकीं २८७ विद्यार्थी हिंदी आहेत.

**यूगोस्लाव्हिआसाठी बटाटे**—युगोस्लाव्हिआंतील अन्नाची टंचाई अंशतः दूर करण्यासाठी अमेरिकेनें बटाटे धाडण्याचें ठरविलें आहे. अमेरिकेंत बटाट्याचें पीक इतके आले आहे कीं बटाट्यांचा उपयोग खतासाठीं करण्यांत येत आहे.

**जर्मनीचें आर्थिक एकीकरण**—रूहरचा औद्योगिक भाग इंग्लंड-फ्रान्स-रशिआ-अमेरिका यांच्या संयुक्त नियंत्रणाखाली ठेवण्याचें ठरलें तरच रशिआ जर्मनीच्या आर्थिक एकीकरणाला मान्यता देईल असें रशिअन उप-परराष्ट्रमंत्री एम्. व्हिशिन्स्की यांनीं जाहीर केलें आहे.

**ब्रिटनच्या आर्थिक कार्यक्रमावर टीका**—ब्रिटिश कारखानदारांच्या संघानें ब्रिटिश सरकारच्या १९४७च्या आर्थिक योजनांवर टीका केली आहे. या सालीं ब्रिटनमधील कोळशाचें उत्पादन २२० कोटि टन झालें पाहिजे अशी मागणी संघानें केली आहे.


कंपनीच्या पहिल्याच वर्षीच्या ऊंसगाळणीस सुरुवात होऊन अद्यावत् पद्धतीचा एकजिनसी गूळ तयार होऊं लागला.

**पांडुरंग ॲग्रिकल्चरल प्रॉडक्टस लिमिटेड**

रजिस्टर्ड ऑफिस व फॅक्टरी : पोस्ट-कुरोली, (जि. सोलापूर)

अधिकृत भांडवल : रु. १०,०००००(दहा लाख)
विक्रीस काढलेलें भांडवल : रु. ५,०००००(पांच लाख)

पुढीलप्रमाणें—१०००—५ टक्के क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स शेअर्स प्रत्येकी रु. १०० चा, ६००० "बी" क्लास ऑर्डिनरी शेअर्स प्रत्येकी रु. ५० चा, १०००० "सी" क्लास ऑर्डिनरी शेअर्स प्रत्येक रु. १० चा ("सी" क्लासचे सर्व शेअर्स खपले आहेत.)

—शेअर्सची विक्री चालू आहे—

त्याच्या रकमा पुढीलप्रमाणें भरावयाच्या आहेत.

अर्जासोबत शेअर्सच्या १/४ व अर्जमंजुरीनंतर १/४ व उरलेली रक्कम प्रत्येक कॉलमध्यें तीन महिन्यांपेक्षा कमी अंतर नसलेल्या दोन हप्त्यांनी.

★ कंपनीस मिरज (ज्यु.) दरबारनें १५ वर्षें इन्कमटॅक्स माफ केला आहे व इतर सवलती देऊन रु. २५,००० चे शेअर्स घेतले आहेत.


★ पहिल्याच वर्षी कंपनी १० टक्के डिव्हिडंड देण्याची हमी घेत आहे.

शेअर-फॉर्म, माहितीपत्रकें याकरितां वरील पत्त्यावर लिहा.

मॅनेजिंग एजन्टस् : जे. व्ही. ताम्हनकर आणि कंपनी.

इन्फर्मेशन ऑफिसेस :
पुणें—लक्ष्मी रोड, गणपति चौक, बुधवार, नं. ६२, पुणें २.
पंढरपूर—नवी पेठ, पंढरपूर.





**अधिक धान्य पिकविण्याची योजना**

—यशस्वी होण्यास—

**किर्लोस्कर पंपिंग सेट्स**

**हें अमोघ साधन आहे.**

त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

# अर्थ

बुधवार, ता. ९ एप्रिल, १९४७





मं. वा. गो. काळे

संपादक :

श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## विकट आर्थिक परिस्थिति

### जागरूक लोकमत आणि एकजूट ह्यांची आवश्यकता

सध्याच्या हिंदी आर्थिक परिस्थितीचें विवेचन सर एच. पी. मोदी ह्यांनीं सेंट्रल बँकेच्या वार्षिक सभेचे प्रसंगीं आपल्या भाषणांत नुकतेंच केलें. नियोजनाबद्दल वायफळ बोलणें चालू आहे, परंतु आर्थिक संसाराची घडी युद्धपूर्व स्थितीस आणण्याचा पद्धतशीर प्रयत्न कोठेंच दिसत नाहीं, अशी त्यांनीं तक्रार केली. कंट्रोल उठवला जातो; पुन: बसविला जातो; गरजेच्या जिनसांचा तुटवडा वाढत आहे; कापड, पोलाद, सिमेंट, कागद, इत्यादींचें उत्पादन घटलें आहे आणि कोळशाचें उत्पादन तर फारच अपुरें पडूं लागलें आहे. शेतीची परिस्थितीहि अधिक समाधानकारक नाहीं. गेल्या वर्षापेक्षा आतां पिकाखालील क्षेत्र व उत्पादन हीं कमीच आहेत, असें सर मोदींनीं सांगितलें. अन्नाचे बाबतींत आपलें परदेशावरील अवलंबन आपल्या संसाराचें स्थैर्य नाहींसें करीत आहे. पुरवठा कमी झाल्याकारणानें किंमती भडकणें अपरिहार्य आहे. सामान्य नागरिकाच्या रहाणीचे दर्जावर त्याचा अत्यंत प्रतिकूल परिणाम झालेला आहे. रहाणीच्या खर्चाचें मान औद्योगिक केंद्रांत वाढत चाललें आहे. सर्व प्रकारच्या उत्पादनांत सत्वर वाढ होणें, हाच ह्या सर्व परिस्थितीवर तोडगा आहे. मध्यवर्ती सरकारचें आर्थिक धोरण ह्यासंबंधांत जेवढें स्पष्ट असावयास पाहिजे, तेवढ तें दिसत नाहीं आणि त्यांत दूरदृष्टीचा आणि संगतवारपणाचा अभाव आहे, असा सर होमींचा, इतर अनेकांप्रमाणें, अभिप्राय आहे.

उत्पादन वाढविल्याखेरीज हिंदुस्थानांत सध्या सर्वत्र भासत असलेली जिनसांची चणचण दूर होणार नाहीं; हें स्पष्ट आहे. ग्रेट ब्रिटनमध्येंहि उत्पादन वाढीचा प्रश्न अत्यंत निकडीचा झालेला आहे; कारण तेथील उत्पादन वाढून त्याची मोठ्या प्रमाणावर निर्गत झाल्याविना इंग्रज लोकांच्या दैनंदिन गरजा दीर्घ काल भागूं शकणार नाहींत, अशी परिस्थिति आहे. प्रेसिडेंट ऑफ दि बोर्ड ऑफ ट्रेड, सर स्टॅफर्ड क्रिप्स ह्यांनीं ह्यासंबंधांत केलेल्या उपयुक्त सूचना हिंदुस्थानांतील प्रश्नासहि लागू पडणाऱ्या आहेत. येतीं दोन-तीन वर्षें आपण आपली सर्व शक्ति उत्पादन वाढविण्यांत खर्चली पाहिजे; पूर्वीपेक्षा कमी तास काम करून हें शक्य होईल, ही कल्पना चुकीची आहे; सध्यांच्या विकट अडचणींतून बाहेर पडल्यावर मग कामाचे तास कमी करणें व्यवहार्य ठरेल, असें त्यांनीं नुकतेंच सांगितलें. उत्पादनाच्या वाढीचा विचार करतांना त्यांनीं कामगार व गिरणीमालक ह्यांचेमध्यें अत्यंत सलोख्याचे संबंध रहाण्यावर जोरानें भर दिला आहे. हिंदी गिरण्या व कारखाने ह्यांचेमधील उत्पादन कामगारांच्या असंतोषामुळें घटत आहे हें सुप्रसिद्धच आहे, आणि संप टाळून कामगारांस जास्त काम अधिक कार्यक्षमतेनें कसें करतां येईल ह्याकडे लक्ष देणें येथेंहि निकडीचें झालें आहे. नवी यंत्रसामुग्री बसवून कारखाने व गिरण्या ह्यांची उत्पादनक्षमता वाढविण्याचें अगत्याहि निर्विवाद आहे. ब्रिटिश सरकार उत्पादन व निर्गत ह्या प्रश्नांकडे जितकें लक्ष देत आहे, तितकें लक्ष आपलें मध्यवर्ती सरकार व प्रांतिक सरकारें देऊं शकत नाहींत, ही मोठीच चिंतनीय गोष्ट आहे. येत्या कांहीं वर्षांचा संक्रमण काळ हिंदी लोकांच्या जीवनास घातुक ठरतो कीं काय, अशी भीति वाटूं लागली आहे. लोकमतांत जागृति निर्माण होऊन तिचा गिरणी मालक, कामगार व देशांतील कुटिल मनोवृत्तीचे संधिसाधू व स्वार्थी लोक ह्यांवर अनुकूल प्रभावी परिणाम सत्वर होणें आगामी संकट टळण्याच्या दृष्टीनें अत्यंत आवश्यक आहे. एकजूट, स्वार्थत्याग, परस्पर विश्वास, अंतिम यशाची आकांक्षा, इत्यादींवांचून आपलें पुढें पाऊल पडणें अवघड आहे.

### सीमेंटच्या उत्पादनांत दुपटीनें वाढ

१९५२ सालच्या सुमारास हिंदुस्थानांतील सीमेंटचें उत्पादन हल्ली उत्पन्न होऊं शकणाऱ्या सीमेंटच्या दुप्पट करण्याचा मध्यवर्ती सरकारचा मनोदय आहे. त्यासाठी प्रांत व संस्थानें यांचे निरनिराळे गट सीमेंटच्या धंद्याला लागणाऱ्या कच्च्या मालाच्या अनुरोधानें करण्यांत यावयाचे आहेत. सीमेंटच्या उत्पादनावर, किंमतींवर आणि वाटणीवर १९४२ सालीं सरकारनें नियंत्रण बसविलें. सध्या प्रांतिक सरकारतर्फे किंमती व वाटणी येवढ्यापुरतें नियंत्रण चालू आहे. युद्धकाळांत इमारती बांधण्याचें आजिबात थांबल्यामुळें सध्या सीमेंटला फार मागणी आहे. परंतु सीमेंटचे कारखाने दर डोई १० ते १२ पौंडापेक्षा अधिक सीमेंट पुरवूं शकत नाहींत. याला कोळशाची टंचाई आणि यंत्रसामुग्रीची झीज हीं प्रमुख कारणें आहेत. पोत्यावरील नियंत्रण उठल्यामुळें सीमेंटच्या उत्पादनाच्या किंमतींतही वाढ झालेली आहे. सरकारच्या योजनेचें स्वरूप पुढील तक्त्यांत दाखविलें आहे.

सीमेंटचें उत्पादन

| आजची उत्पादन क्षमता | १९५२ सालीं संकल्पित वाढ | चालू कारखाने | १९५२ सालापर्यंत निघूं शकणारे कारखाने | १९५२ सालांतील संभाव्य मागणी |
|---|---|---|---|---|
| वार्षिक ३ लाख टन | वार्षिक ६० लाख टन | २३ | (अ) १९ नवीन<br>(ब) १५ जुने वाढविलेले | (अ) ४० लाख टन नागरी मागणी<br>(ब) १० लाख टन धरणें वगैरे |

सध्या जुन्या कारखान्यांचा विस्तार व नवीन कारखान्यांच्या उभारणीचें काम चालू आहे. फेब्रुआरी १९४७ अखेर २७ नव्या कारखान्यांना परवाने दिलेले असून २१ कारखान्यांच्या यंत्रसामुग्रीसाठी देशी व परदेशी मागणी नोंदविण्यांत आली आहे. १९३८–३९ सालीं प्रत्यक्ष उत्पादन १५ लाख, ११ हजार, ९०० टन होतें. १९४५–४६ सालीं तें २० लाख, ७५ हजार, ३०० टन झालें.

# स्फुट विचार

### रुपया—स्टर्लिंग लग्न मोडणार

हिंदी रिझर्व्ह बँक कायद्याचीं ४० व ४१ हीं कलमें रद्द करून त्यांच्या जागीं नवीं कलमें घालणारें एक बिल मि. लियाकत अली खान ह्यांनीं मध्यवर्ती असेंब्लींत मांडलें आहे. ४० व ४१ ह्या कलमांनीं रुपयाची स्टर्लिंग पौंडाशीं हुंडणावळ कायम स्थिर राखण्याची जबाबदारी रिझर्व्ह बँकेवर टाकलेली आहे. रुपयाचें पौंडाशीं नातें जोडलेलें आहे. रुपयास एक शिलिंग, पांच पेन्स व एकूण-पन्नास चौसष्टांश पेनी ह्या दरानें बँकेनें पौंड-स्टर्लिंग उपलब्ध करून दिले पाहिजेत; त्याचप्रमाणें रुपयास एक शिलिंग, पाच पेन्स व तीन-सोळांश पेनी ह्या दरानें पौंड स्टर्लिंग तिनें विकत घेतले पाहिजेत असें बँकेवर बंधन आहे. अर्थात्, खरेदी अथवा विक्री किमान १० हजार पौंडांची तरी असली पाहिजे; परंतु कमाल रकम केवढी असावी, हें कायद्यानें सांगितलेलें नाहीं. आतां हिंदुस्थाननें इंटर नॅशनल मोनेटरी फंडाचें सभासदत्व पत्करलेलें आहे आणि त्याच्या कराराप्रमाणें प्रत्येक सभासद राष्ट्रानें आपल्या चलनाची सम ('पार') किंमत अमूक इतके सोनें अशा स्वरूपांत व्यक्त करावयाची असतें. देशांनीं अशा व्यक्त केलेल्या किंमतींचे प्रमाणावर त्यांचेमधील हुंडणावळ अवलंबून राहील. रुपयाचें परराष्ट्रीय चलनाशीं नातें ठरविण्यासाठीं ह्यापुढें पौंड स्टर्लिंग हाच एकटा आधारभूत उरलेला नाहीं; कोणत्या दरानें पौंड घ्यावे किंवा विकावे, हें आतां इं. मो. फंडाच्या कराराप्रमाणें ठरणाऱ्या हुंडणावळीच्या दरावर अवलंबून रहाणार आहे. इतके दिवस, रिझर्व्ह बँक कायद्याप्रमाणें, पौंडाखेरीज इतर चलनें देण्या-घेण्यास बँकेस अधिकार नव्हता. तो अधिकार तिला देणेंहि आतां आवश्यक झालें आहे. अशा रीतीनें, हिंदुस्थानास ब्रिटिश पौंडाच्या मध्यस्तीशिवाय इतर देशांशीं स्वतंत्र हुंडणावळीचें नातें निर्माण करणें शक्य होणार आहे.

---

### "हिंदी कपास कापडाच्या गिरण्यांना संरक्षणाची आवश्यकता उरली नाहीं"

हिंदी कपास कापडाच्या धंद्याची परिस्थिति भरभक्कम आहे. बहुतेक कंपन्यांनीं आपल्या भांडवलाची पुनर्घटना केलेली आहे आणि भविष्यकाळास यशस्वीपणें तोंड देण्यास त्या समर्थ आहेत. त्यांचें उत्पन्न मात्र आतांपासूनच घटूं लागलें आहे. हिंदी गिरण्यांना उत्पादन कमी करावयास लावील किंवा त्यांचें उत्पादन गैर-किफायतशीर होईल, इतकी मोठी कापडाची आयात लवकर होऊं लागण्याची शक्यता नाहीं. अमेरिकेंतील उत्पादन मुख्यत: चीन, फिलिपाइन्स, दक्षिण अमेरिका, युरोपांतील देश, इत्यादींकडेच आधीं जाईल. जोंवर कंट्रोल चालू आहे, तोंवर संरक्षणाची आवश्यकताच नाहीं. कंट्रोलमुळें ठराविक किंमतीस उत्पादनाच्या उठावाची हमी मिळाल्यासारखीच आहे, आणि त्या किमतींत योग्य नफा आकारलेला असतोच तेव्हां, हिंदी गिरण्यांना ह्यापुढें संरक्षणाची आवश्यकता नाहीं." :— टारिफ बोर्डाचा रिपोर्ट

## दि त्रावणकोर ओगले ग्लास मॅन्युफॅक्चरिंग कं. लि.

### वार्षिक सभेंतील अध्यक्षांच्या भाषणांतील उतारे

दि त्रावणकोर ओगले ग्लास मॅं. कं. लि. ची वार्षिक साधारण सभा काच कारखान्यांत मंजुमेल, अलवाई, येथें २९ मार्च रोजीं भरली होती. त्या वेळीं कंपनीचे चेअरमन, राज्यसेवानिरत एस. चट्टनाद करयालार ह्यांनीं आपल्या भाषणांत कंपनीच्या ३१ डिसेंबर १९४६ अखेरच्या कार्याचा आढावा घेतला. ते म्हणाले:—

"कंपनीच्या ह्या चवथ्या वार्षिक साधरण सभेस मी आपलें मन:पूर्वक स्वागत करतों.

"गेल्या वर्षी एकूण ४,००,००० रुपयांचा काचमाल तयार झाला होता; अहवालाचे वर्षी तो आकडा सुमारें ५,००,००० रु. झाला. भांडवली जिंदगीवरील घसाऱ्याची योग्य तरतूद करून ५% डिव्हिडंड डायरेक्टर सुचवीत आहेत. गेल्या वर्षी ६½% डिव्हिडंड दिलें होतें. डिव्हिडंडचा दर उतरविण्याचीं मुख्यत: दोन कारणें आहेत:—(१) उत्पादनाच्या खर्चांत वाढ आणि (२) कंपनीचें वाढलेलें शेअर भांडवल. शेअर भांडवल वाढलें आहे आणि हें भांडवल उत्पादक रीतीनें वापरलें गेलें नाहीं हें लक्ष्यांत घेतलें, म्हणजे गेल्या वर्षीपेक्षा आतां सुचविलेला डिव्हिडंडचा दर वास्तविक वाढीचाच आढळून येईल.

"अहवालाचे वर्षी कामगारविषयक परिस्थिति समाधानकारक होती, असें सामान्यत: म्हणतां येईल. कामगारांना मिळालेल्या मजुरीच्या ½ इतका बोनस अहवालाचे वर्षाकरितां त्यांना दिलेला आहे.

"१९४७ चे प्रारंभापासून कंपनीनें कामगारांचेसाठी प्रॉव्हिडंट फंडाची योजना सुरू केली आहे. फराळाच्या सोई, औषधपाणी, इत्यादि कामगारांच्या सुखसोईसाठी अहवालाचे वर्षी ११,००० रु. खर्चण्यांत आले. त्यांच्या सुखसोई पहाण्यासाठी एक स्वतंत्र लेबर वेलफेअर अधिकारी नेमण्यांत आलेला आहे.

"कामगार व नोकर ह्यांच्या वेतनांत १९४६ चे प्रारंभी वाढ करण्यांत आली व १९४७ चे प्रारंभापासून त्यांत आणखी वाढ केलेली आहे.

"कामगार आणि व्यवस्थापक ह्यांची भरभराट कंपनीच्या भरभराटीवरच अवलंबून आहे हें जाणून, कंपनीच्या हिताकडे ते आपुलकीनें बघत रहातील अशी मला आशा आहे.

"शीट ग्लास ड्रॉइंग मशीन, ऑटोमॅटिक बॉटल ब्लोइंग मशीन्स सुधारलेल्या पद्धतीच्या फरनेसेस व अनीआलिंग लेहर्स ह्यांची ऑर्डर पाठविली असून त्यांपैकीं कांहीं यंत्रसामुग्री चालू वर्षापूर्वीच आपल्या हातीं येतील व बाकीची १९४८. चे प्रारंभीं आपणांस मिळेल. डायरेक्टरांचे रिपोर्टांत ह्याचा उल्लेख केलेलाच आहे. माल चढविण्यासाठी व उतरविण्यासाठी जेटी, वेअर हाउसेस, इत्यादींचें बांधकाम हातीं घेण्यांत आलें असून, फरनेस व यंत्रसामुग्री बसविण्यापूर्वी तें पुरें होईल अशी अपेक्षा आहे.

"अहवालाचे वर्षी २ रु. वाढाव्यानें ५,०,००० रुपयांचे शेअर्स विक्रीस काढले ते सर्व तात्काळ खपले. वाढाव्याचे नवे मिळालेले १,००,००० रुपय जनरल रिझर्व फंडांत वळते करण्यांत आले आहेत. गेल्या महिन्यांत भरलेल्या विशेष साधारण सभेंत भागीदारांनीं कंपनीचें अधिकृत भांडवल १०,००,००० रुपयांचे २५,००,००० रुपये करण्यास संमति दिलेली आहे."

---

**जननाचें प्रमाण**—१९४५ सालीं, जगांतील सर्वांत मोठें जननाचें प्रमाण (दर हजार वस्तीस ४१·७) पॅलेस्टाइनमध्ये आढळलें. बेल्जममध्ये तें सर्वांत कमी म्हणजे १५·४ होतें. हिंदुस्थानांत तें २९·५ होतें.

## आर्थिक अरिष्टाचें आगमन

लेखकः—श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्.

देशाच्या सर्वांगीण आर्थिक प्रश्नास वाहिलेल्या 'टाटा क्वार्टर्ली' च्या मागील निघालेल्या अंकांत देशावर येऊं घातलेल्या आर्थिक अरिष्टापासून सावध रहाण्याकरतां भयसूचक घंटानाद करण्यांत आलेला आहे, त्याकडे आम्ही वाचकांचें लक्ष वेधूं इच्छितों. मालाच्या वाहतुकीवरील व उपभोग्य वस्तूंच्या किंमतीवरील नियंत्रणें, वास्तविक त्यांचा पुरवठा फारच मर्यादित असतांना, उठवण्याचें धोरण लवकरच घातक ठरल्याशिवाय राहणार नाहीं. नियंत्रणें काढल्या बरोबरवस्तूंच्या किंमती बेगुमान चढत आहेत व त्यामुळें राहणीचा खर्च सर्वसाधारण जनतेच्या आटोक्याबाहेर अगोदरच गेलेला आहे तो कधींच आवरणें शक्य होणार नाहीं अशी परिस्थिति उद्भवूं पहात आहे. याचा परिणाम कामकऱ्यांनीं जास्त वेतनांकरितां संप पुकारण्यांत साहजिकच होत आहे. डिसेंबर १९४६ च्या संपलेल्या तिमाहींतील आर्थिक परिस्थितीवरून, ज्यांना आर्थिक परिस्थिति बिघडत चाललेली आहे असें वाटूं लागले होतें त्यांची शंका निश्चित दृढतर होत चालली आहे.

यावरून असें म्हणणें जरूर आहे कीं, मध्यवर्ती आणि प्रांतिक सरकारें यांना वस्तुस्थितीच्या कठोरतेची पुरेशी जाणीव नाहीं, आणि त्यामुळें नियंत्रणाचें धोरण सैल होऊं पहात आहे. जर पुढील कांहीं महिन्यांत मंदी एकदम चालून आली तर त्याचा दोष सर्वस्वी सरकारवर पडेल.

वरील परिस्थिति उद्भवण्याचें मूळ कारण जें महायुद्ध तें संपून दोन वर्षांवर काळ होऊन गेलेला आहे. अमेरिकेसारखीं राष्ट्रें एव्हांना शांतताकालीन उत्पादनाच्या मार्गे लागून जगाच्या बाजारपेठांतून मालाचा पुरवठा प्रत्यक्ष पाठविण्यापर्यंत मजल मारून राहिलीं आहेत. हिंदुस्थानांत प्रत्यक्ष युद्ध झालें नसल्याकारणानें हिंदुस्थाननें निदान स्वयंपूर्णतेच्या दिशेनें एकादें तरी पाऊल टाकलेलें दिसावयास हवे होतें, पण सर्व नियोजनाचे आराखडे अजून धूळ खात पडले आहेत. आतां तुटीचीं अंदाजपत्रकें येऊं घातल्याकारणानें योजना मागेंच पडत चाललेल्या दिसतील; चलनाच्या संकोचाचा व वाढत्या व्याजाच्या दरांचा बाऊ करण्यांत येईल. या कवळ आर्थिक गोष्टी झाल्या. उद्योगधंदे वाढीस लागण्यास आवश्यक असलेली राजकीय शांतता दिवसेंदिवस दूर पळत चाललेली आहे. धर्मवेडी व स्वतःचें हित न समजणारी भोळी अंध जनता स्वार्थी पुढाऱ्यांच्या प्रोत्साहनामुळें अत्याचारास प्रवृत्त होत आहे व त्यामुळें सर्व हिंदुस्थानांतील व्यापार उदीम बसूं लागले आहेत आणि मालमत्तेची हानि होत आहे. ब्रिटिशांनीं इतके दिवस पाठपुरावा केलेल्या चाणक्य नीतीचा हा परिपाक देशाला आतां भोंवतों आहे आणि सर्वनाश टाळणें अवश्य आहे असें वाटत असेल तर धर्मवेड्या जनतेनें वेळींच सावध होऊन अखंड व एकजिनसी देश राखून आपली स्वतःची व आपल्या बांधवांची येणाऱ्या आर्थिक अरिष्टापासून सुटका करून घेतली पाहिजे. नाहींतर निश्चित येणारें हें आर्थिक अरिष्ट त्यांच्यासगट सगळ्या हिंदुस्थानचा बळी घेतल्याशिवाय राहणार नाहीं.

---


**पेट्रोलच्या किंमतींत वाढ**—हिंदुस्थान सरकारनें पेट्रोलची किंमत दर गॅलनमागें एक आण्यानें वाढविली आहे. आतां दर गॅलनास, साडे आठ आणे पडतील.

**कोल्हापूर दरबारचें नवें धोरण**—कोल्हापूरचा राज्यकारभार पाहणाऱ्या कौन्सिलनें ता. १ एप्रिल पासून हुजूर ट्रेझरी बंद केली असून यापुढें पैशाचे सर्व सरकारी व्यवहार बँक ऑफ कोल्हापूरतर्फे होणार आहेत. ही नवी व्यवस्था कौन्सिलनें नेमलेल्या काटकसर समितीच्या शिफारसी प्रमाणें करण्यांत आली आहे.

**त्रावणकोर संस्थानसाठी भूगर्भशास्त्रज्ञ**—त्रावणकोर संस्थानांतील खनिज संपत्तीची मोजदाद करून त्या विषयांतील स्थानिक तज्ञ तयार करण्यासाठी त्रावणकोर विद्यापीठानें एका स्कॉटिश तज्ञाची तीन वर्षांपुरती नेमणूक केली आहे. ब्रिटिश सरकारनें त्रावणकोर संस्थानच्या दिमतीला हा तज्ञ दिला आहे.

**सुएझचा कालवा व ईजिप्त**—१९६८ सालीं सुएझ कालव्याबाबत ईजिप्तनें दिलेल्या सवलतीची मुदत संपणार आहे. त्यानंतर कोणत्याही सबबीवर या कालव्यावर ईजिप्तचीच सत्ता राहील असें ईजिप्तच्या अर्थमंत्र्यांनी जाहीर केलें आहे. त्या दृष्टीनें ईजिप्शिअन भांडवलदारांनी कालव्याच्या शेअर्समध्यें पैसे गुंतवावेत अशी सूचनाही त्यांनी केली.

**१०० ब्रिटिश नागरिकांवर खटले**—युरोपमध्यें जाऊन ब्रिटिश चलन विषयक कायदे मोडल्याबद्दल सुमारें १०० ब्रिटिश नागरिकांवर खटले भरण्यांत आले आहेत. त्यापैकी २५ स्त्रिया असून दोघेजण किताब विभूषित आहेत. एका आरोपीवर युरोपांतील सुखसहलींत १,००० पौंड खर्च केल्याचा आरोप आहे. कायद्या प्रमाणें ७५ पौंडापक्षा अधिक खर्च करता येत नाहीं



# हिंदुस्थानची शेती व सरकारी शेती खातें

लेखकः–श्री. भास्कर महादेव काळे, एम्. ए., बी. टी., मुंबई

## आजची स्थिति

हिंदी जनतेपुढें सांप्रत जे अनेक महत्त्वाचे प्रश्न आहेत त्यांपैकीं वाढत्या लोकसंख्येची अन्नविषयक गरज पुरविण्याच्या दृष्टीनें व दुष्काळासारख्या आपत्तींना तोंड देण्याच्या दृष्टीनें शेती सुधारण्याचा प्रश्न फार महत्त्वाचा आहे. शेतीमुळें हिंदी जनतेचें प्राथमिक जीवन शक्य होतें, व सांप्रत ७३ टक्के हिंदी जनता शेतीवर चरितार्थासाठीं अवलंबून आहे हें लक्षांत घेतलें म्हणजे शेतीचें महत्त्व सहज पटतें. महायुद्धानंतरच्या काळांत बदललेल्या परिस्थितीच्या अनुरोधानें ज्याप्रमाणें आपल्या औद्योगिक जीवनांत फरक करणें आवश्यक आहे, तितकेंच शेती सुधारणेचा प्रश्न हातीं घेणें आवश्यक आहे. युरोपांतील सर्व देशांनीं व अमेरिकेनेंहि पहिल्या महायुद्धानंतरच्या काळांत शेती सुधारणेचा प्रश्न हातीं घेतला व आपापल्या देशांत शक्य त्या सुधारणा केल्या. आंतरराष्ट्रीय शेती परिषदा भरविल्या जाऊं लागल्या, व धंदा या दृष्टीनें शेतीचे बाबतींत शास्त्रीय व व्यावहारिक दृष्टि निर्माण केली गेली. हिंदुस्थानांत या काळांत शेती कमिशननें अहवाल सादर केला; मध्यवर्ती कृषिसंशोधन समितीची स्थापना झाली, कापूस, ताग व ऊंस या बाबतींत संशोधन व मार्गदर्शन करण्यासाठीं स्वतंत्र संस्था स्थापिल्या गेल्या; परंतु एवढें करून शेतीचे बाबतींत म्हणण्यासारखी कांहींच सुधारणा झाली नाहीं तर उलट कापूस व तेल-बिया यांचें उत्पादन निर्यातीसाठीं प्रमाणाबाहेर वाढविलें गेलें, व अन्नविषयक पिकें व व्यापारी पिकें यांत समतोलपणा राहिला नाहीं हें युद्ध–परिस्थितीनें चांगलेंच निदर्शनास आलें. कांहीं ठिकाणीं पाटबंधाऱ्यांचीं कामें वाढविलीं गेलीं, परंतु कराच्या बोजामुळें त्याचा फायदा शेतकरी वर्गाला मिळावा तितका मिळाला नाहीं. शेती खात्यानें तर अमोनिया सल्फेट हें खत प्रचारद्वारें उपयोगांत आणविलें. परंतु या खतानें जमिनी तात्पुरत्या सुपीक होतात, पण पुढें त्यांचा मगदूर कायमचा कमी होतो असें उघडकीस आलें आहे. सरकारनें प्रचारांत आणलेल्या उंसाच्या जाती अशा आहेत कीं, त्या जातीच्या उसाचा रस जुन्या पद्धतीच्या चरकावर काढतां येत नाहीं, तर तो ऊस साखर–गिरण्यांतच पाठवावा लागतो. १९३० नंतरच्या जागतिक मंदीमुळें शेती-मालाच्या किंमती भरमसाट उतरल्यामुळें, शेतकरी वर्गाची आर्थिक स्थिति जास्तच खालावली.

## शेती खात्याकडे पहाण्याची नवी दृष्टि

हल्लींच्या अर्थ–प्रधान समाजरचनेमध्यें सरकारचीं कर्तव्यें व कार्यक्षेत्र हीं जास्त जास्त विस्तृत होत आहेत. समाज–जीवनाच्या प्रत्येक बाबतींत बहुजनसमाजाच्या हिताच्या दृष्टीनें सरकार नियमन करतें, शिक्षणाप्रमाणेंच 'शेती खातें' हा सुधारलेल्या पाश्चिमात्य देशांत सरकारी नियंत्रणाखालीं येणारा विषय बनला आहे. या बाबतींत अमेरिकन शेती खात्यांत गेल्या पंचवीस वर्षांत झालेली सुधारणा बरीच अनुकरणीय आहे. हिंदुस्थानांतील 'शेती खातें' म्हणजे दरवर्षी ठराविक पद्धतीचा अहवाल तयार करणारें खातें व कांहीं ठिकाणीं मॅाडेल फार्मस ठेवून शेतीच्या ज्ञानाचा प्रचार करणारें खातें एवढाच अर्थ समजला जातो. साधारण शेतकरी वर्ग व 'सरकारी शेती खातें' यांचा हिंदुस्थानांत परस्पर संबंध फारसा नसतोच, असें म्हणणें अयोग्य होणार नाहीं. 'शेती खात्याची' सुधारलेली कल्पना अशी आहे कीं, शेती खात्याचा व्यापक रीतीनें शेतकऱ्याच्या जीवनाशीं निकटचा संबंध आला पाहिजे, व शेती–खातें हें मार्गदर्शन करणाऱ्या पालकाप्रमाणें उपयुक्त असलें पाहिजे. या दृष्टीनें शेती खात्याच्या कक्षेंत पुढील सर्व गोष्टी येतातः–निवडक बीं-बियाण्याचा प्रचार करणें, शेतीचें उत्पन्न दर एकरीं वाढेल असे प्रयत्न करणें, पिकांचे अंदाज प्रसिद्ध करून देशाच्या गरजेच्या दृष्टीनें कोणत्या पिकांची किती प्रमाणांत लागवड करावी याबद्दल आगाऊ निश्चित सूचना देणें, पाणीपुरवठ्यासाठीं तळीं, विहिरी, पाटबंधारे बांधणें इ. गोष्टी, शेतकरी वर्गाचा कर्जबाजारीपणा कमी करण्यासाठीं शेती मालाचे बाजारभाव ठरविणें व सहकारी चळवळीला मदत, शेत कामगारांच्या मालकीच्या शेत जमिनी होतील या दृष्टीनें कायद्यांत सुधारणा करणें, शेतीचे लहान लहान तुकडे पडणार नाहींत याकडे लक्ष देणें, लहान लहान जमिनींच्या तुकड्यांचें एकीकरण करणें, आपत्ति आली असतां शेत-साऱ्यांत सूट देण्याची शिफारस करणें व शेतकऱ्याला बदलणाऱ्या जागतिक परिस्थितिप्रमाणें उपयुक्त ज्ञान पुरविणें व व्यावहारिक शेतीचें शिक्षण देणाऱ्या शाळा व कॉलेजें काढणें इ. सारांश, शेती खातें हा शेतकऱ्याच्या जीवनाचा मध्यबिंदू झाला पाहिजे. शेती खात्याचें कार्यक्षेत्र याप्रमाणें व्यापक दृष्टीनें विस्तृत झाल्याशिवाय व शेतीच्या प्रश्नाकडे पहाण्याचा सरकारचा दृष्टिकोन आमूलाग्र बदलल्याशिवाय हिंदी शेतकरी वर्गाच्या परिस्थितींत सुधारणा होणार नाहीं. हा प्रश्न संपूर्ण स्वातंत्र्यानेंच सुटणार आहे हें खरें आहे; तरीपण सांप्रत हातीं असलेल्या राजकीय हक्कांचा पूर्ण उपयोग केल्यास यापैकीं कांहीं प्रश्न सोडविणें सोपें जाईल. नवीन दृष्टिकोनाप्रमाणें शेती खात्याचा अर्थ इतका व्यापक होतो कीं जमीन-महसूल, पाटबंधारे, जंगल, सहकारी चळवळ, संशोधन व भाव–नियंत्रण इ. खातीं शेती खात्यांत समाविष्ट होतात. सुदैवानें आज हिंदुस्थानांत कांहीं वाङ्मय व उपयुक्त माहिती व सुशिक्षित लोक उपलब्ध आहेत. मुख्य प्रश्न संघटनेचा आहे. ही संघटना अंतःस्फूर्तीनें झाली पाहिजे. असें झालें म्हणजे जन–मताचें सरकारवर दडपण आणून, शेती खातें अमेरिकन शेती खात्याप्रमाणें व्यापक व उपयुक्त करतां येईल.

## शेती पूर्वीप्रमाणें सोपी राहिली नाहीं

सांप्रतच्या धकाधकीच्या मामल्यांत व तीव्र जीवनकलहांत शेतीचे प्रश्न हे पूर्वीप्रमाणें सोपे राहिलेले नाहींत हें ध्यानांत आणलें पाहिजे. पूर्वी परंपरेनें चालत आलेली शेती सर्वजण करीत असत, व थोड्या गरजा व स्वयंपूर्ण देश यामुळें शेतीचे प्रश्न अगदीं सोपे होते. आज वाढती लोकसंख्या, परराष्ट्रीय व्यापाराचें बदललेलें स्वरूप, भौगोलिक दृष्ट्या सर्व जग एक होणें किंवा देशांतील अंतर कमी होणें, अमेरिका व रशिया येथील शेतीची सुधारणा, संशोधन व यंत्रांचा उपक्रम इ. अनेक गोष्टींमुळें शेतीचा प्रश्न जास्त गुंतागुंतीचा व कठीण झाला आहे. शेती कोणाहि अडाणी माणसानें कशीहि करावी असा काळ आतां उरला नाहीं. शेतीचें अर्थशास्त्रहि निर्माण झालें आहे. कराची येथें डिसेंबर अखेर भरलेल्या शेतीच्या अर्थशास्त्रज्ञांच्या परिषदेंत सर मणिलाल नानावटी यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत केलेल्या सूचना व्यावहारिक व अतिशय उपयुक्त आहेत. जनता व सरकार यांमध्यें योग्य प्रचार करण्यासाठीं प्रत्येक गांवांत लोकसंस्था स्थापिल्या जाव्या, नालायक लोकांनीं शेतीचा धंदा सोडावा व शेती व ग्रामीण जीवन याबद्दलचे आंकडे प्रसिद्ध केले जावे अशा सूचना सर मणिलाल ह्यांनीं केल्या. यांत्रिक विद्या, रासायनिक धंदे इ. हस्तगत करण्याकडे जसें सुशिक्षितांचें व जबाबदार व्यापारी कारखानदार इत्यादींचें लक्ष गेलें आहे, त्याचप्रमाणें हिंदी शेती हरतऱ्हेनें सुधारण्याकडे व शेतकरी वर्गाला आर्थिक व व्यावसायिक स्वास्थ्य प्राप्त करून देण्याकडे त्यांचें लक्ष वेधलें पाहिजे.

---

## बीटाची व उसाची साखर

युरोप व उत्तर अमेरिका येथें बीटापासून साखर तयार करण्यांत येते; आशिया, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया व दक्षिण अमेरिका येथें ती उसापासून बनविली जाते. गेल्या महायुद्धाचे पूर्वी पर्यंत, युरोपांत खपणाऱ्या साखरेपैकी १०% साखर उसाचीच असे. जावा, क्युबा वगैरे साखर उत्पादन करणाऱ्या प्रमुख देशांत उत्पादनाचा खर्च कमी होत चालला होता आणि युरोप व उत्तर अमेरिका येथील साखरेच्या धंद्यास संरक्षण द्यावें लागत असे तरी बीट व उंस त्यांपासून साधारणपणें सारखेच टन साखर बनविली जाई. १९२५–२६ मध्यें एकूण उत्पादनांत उसाच्या साखरेचा हिस्सा दोन तृतीयांशावर गेला. १९३९–४० सालांतील एकूण २ कोटि, ९७ लक्ष टन उत्पादनापैकी उसाची साखर १ कोटि, ८४ लक्ष टन होती. १९४७ च्या २ कोटि, ६६ लक्ष टनांच्या जागतिक अपेक्षित उत्पादनांत उसाची साखर १ कोटि, ७१ लक्ष टन भरेल अशी अपेक्षा आहे.

## मुंबई शेअर बाजार

गुरुवार, दि. २७ मार्च पासून गेल्या सोमवारपर्यंत बाजार बंद होता.

सोमवारपासून " कॅश सेक्शन " चालू आहे.

गुरुवार, दि. १० एप्रिलपर्यंत वायद्याचे व्यवहार बंद आहेत. ते शुक्रवार, दि. ११ पासून चालू होण्याचा संभव वाटतो.

## दि मिरज स्टेट बँक लि. मिरज

### तुलनात्मक प्रगतीचा तक्ता

१९२९:—स्थापना

१९३८:—लक्ष्मेश्वर ( जि. धारवाड ) व मोडनिंब ( जि: सोलापूर ) ह्या मिरज संस्थानांतील दोन शहरांत शाखांची स्थापना.

१९४०:—कुर्डुवाडी ( जि. सोलापूर ) येथील शाखेची स्थापना

१९४५:—पंढरपूर येथील पे ऑफिसला प्रारंभ.

| ताळेबंदाचें वर्ष | जमा शेअर भांडवल | रिझर्व फंड | ठेवी | खेळतें भांडवल | एकूण नफा | निव्वळ नफा | एकूण डिव्हिडंडची रक्कम | डिव्हिडंडचा दर ( % करमाफ ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९३५ | २०,०००/- | २,२०० | ११,३५०००/- | १२,१८,३३९/- | १७,०८० | १६,९०० | ८०० | ४% |
| १९३६ | २०,०००/- | ६,४०० | ११,१३०७० | १२,१३,००० | ५,१७३ | ५,०९२ | ६०० | ३% |
| १९३७ | २०,००० | ६,७०० | १०,१६००० | ११,२८,६०० | १४,५८३ | १४,६१० | १,००० | ५% |
| १९३८ | २० ००० | १०,००० | १०,४३००० | ११,९८,३३५ | ९,९७६ | ९,९४१ | १,१०० | ६% |
| १९३९ | २०,००० | ११,१०० | ११,७३००० | १३,२२,२८८ | १२,२२९ | १२,१७१ | १,६०० | ८% |
| १९४० | २०,००० | १५,००० | १४,३९००० | १६,१२,००० | ११८०० | ११,७८५ | २,००० | १०% |
| १९४१ | २०,००० | २०,००० | १७,५४००० | १९,५६,००० | २०,१२७ | १९,८७८ | २,४०० | १२% |
| १९४२ | २०,००० | ३४,३८५ | २१,८१००० | २४,०३,००० | १६,०८७ | १५,९१३ | ३,२०० | १२% व ४% बोनस |
| १९४३ | २०,००० | ३४,३०० | ३३,४६००० | ३५,९९,००० | १२,७०० | १२,४५५ | ३,४०० | १४% व ३% बोनस |
| १९४४ | २०,००० | ३८,२५० | ४६,६५००० | ४९,२४,००० | ४४,७६१ | ४४,६७७ | ३,६०० | १४% व ४% |
| १९४५ | २०,००० | ६६,७८९ | ५९,७४००० | ६३,५२,००० | १,०७,२११ | १,०७,२०० | ४,००० | १४% व ६% |
| १९४६ | २०,००० | १,६९,९०० | ७७००००० | ८२,३५,००० | ८२,१३९ | ८०,८७७ | ४,००० | १४% व ६% |

**मेक्सिकोंतील चांदीचीं नवीं नाणीं**—मेक्सिकोंतील १० कोटी पेसो किमतीचें कागदी चलन रद्द करण्यांत येणार असून त्या ऐवजीं २ कोटी ९० लाख चांदीचीं नाणीं व्यवहारांत आणलीं जाणार आहेत. या नव्या चलनामुळें मेक्सिकोंतील चांदीच्या खाणी भरभराटतील आणि जगांतील चांदीच्या किमती वाढतील असें मेक्सिकोच्या बँकेच्या डायरेक्टरचें मत आहे. या नव्या नाण्यांत अमरिकेच्या डॉलरपेक्षां अधिक चांदी राहील.

**इमारतीसाठी पोलाद**—चालू वर्षांत प्रांतिक सरकारांना २ लक्ष ५० हजार टन पोलाद, शेतीचीं अवजारें, घरें वगैरे बांधण्यासाठी पुरविण्यांत येईल असें मध्यवर्ती सरकारचे उद्योगमंत्री श्री. राजगोपालाचारिअर यांनीं जाहीर केलें आहे. प्रांतांशीं सहकार्य करून सरकारी पोलादाचे कारखाने काढण्याचा सरकारचा विचार आहे, असेंही ते म्हणाले.

**दफनविधि कामगारांचा संप**—ऑस्ट्रेलियांतील सिडनें शहरांतील दफनाचे खड्डे करणाऱ्या व प्रेतें जाळण्याच्या कामावर असलेल्या कामगारांनीं अधिक पगारासाठी संप केला होता. आतां त्यांनीं ईस्टरची सुट्टी संपेपर्यंत आपलें काम चालू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

**हिंदी घटना-समितीची बैठक**—हिंदी घटना समितीची पुढची बैठक ता. २८ एप्रिल रोजीं दिल्ली येथें भरणार आहे. नागरिकांच्या मूलभूत हक्कासंबंधी नेमलेल्या कमिटीचा अहवाल तयार झाला आहे असें समजतें. एप्रिलच्या १६ तारखेस हिंदी युनिअन सरकारच्या अधिकारासंबंधीच्या कमिटीची बैठक भरणार आहे.

**नव्या तऱ्हेची आगगाडी**—सर्व वर्गांच्या उतारूंसाठी बनविण्यांत आलेली 'सिल्व्हर ॲरो' नांवाची आगगाडी हिंदुस्थान सरकारच्या कांहीं मंत्र्यांना नुकतीच दाखविण्यांत आली. या गाडींत इंटरचा वर्ग रद्द करण्यांत आलेला आहे. तिसऱ्या वर्गांतील बाकांची रुंदी ५ इंचांनीं वाढविण्यांत आली आहे व डब्यांत पंख्यांची सोय केलेली आहे. लोकमत अजमावण्यासाठी ही गाडी लौकरच हिंदुस्थानच्या दौऱ्यावर निघणार आहे.

**इंग्लंडमधील थंडीचा प्रताप**—ब्रिटनमध्यें नुकत्याच झालेल्या हिमवृष्टीनें तेथील अन्नाची परिस्थिति फारच बिकट झाली आहे. १४ लाख मेंढ्या, ३० हजार गुरें थंडींत नाश पावलीं आहेत. १ लाख एकरांतील हिंवाळी गव्हाचें पीक आणि १ लाख टन बटाटे साफ बुडाले. ब्रिटनमधील शेतकऱ्यांच्या संघटनेनें या आपत्तीला तोंड देण्यासाठी एक फंड काढला आहे.

## कंपनी कायद्याचें ८६ ( व ) कलम व डायरेक्टरांचे कंपनीशीं करार.


राजा धनराजगिरजी नरसिंगगिरजी ह्यांचे जवळ धनराज मिल्स लि. चे ३,००० शेअर्स असून ते तिचे डायरेक्टर व चेअरमन होते. त्यांचें संचालकत्व रद्द झालें असल्याचें त्यांना १५ ऑक्टोबर १९४६ रोजीं कळविण्यांत आलें. कंपनीकडून त्यांनीं कांहीं माल खरेदी केल्याकारणानें, कंपनी कायद्याच्या ८६ ( व ) कलमाप्रमाणें ही गोष्ट केली, असा त्यांस खुलासा करण्यांत आला. त्या तारखे-नंतर राजा धनराजगिरजींचेकडे बोर्डाच्या सभांचीं निमंत्रण पाठविलीं जाण्याचें बंद झालें. वरील ८६ ( व ) कलमाचा जो भग करील, तो डायरेक्टर रहाण्यास अपात्र होईल, असें धनराज मिल्स लि. ह्या कंपनीचें १०७ वें आर्टिकल सांगतें. इतर सर्व डायरेक्टरांच्या संमतीशिवाय कोणत्याहि डायरेक्टरानें माल खरेदी-विक्रीचा कंपनीशीं करार करतां कामा नये, असा प्रस्तुत ८६ ( व ) कलमाचा अर्थ आहे. राजासाहेबांनीं हायकोर्टाकडे अर्ज करून दाद मागितली. न्यायमूर्ति भगवती हे आपल्या निवाड्यांत म्हणाले:— “अर्जदारानें कंपनीशीं खरेदीचा कांहीं करार केला, हें सिद्ध झालेलें नाहीं. त्याच्या सेक्रेटरीनें माल खरेदी केला, तो कंपनीनें किरकोळ विक्रीसाठी उघडलेल्या दुकानांतून केला. बाहेरच्या इतर गिऱ्हाइकाप्रमाणें माल खरीदण्याचा अर्जदारास अधिकार होताच. नफा काढण्यासाठीं खरेदी केलेली नव्हती; तेव्हां ८६ ( व ) कलमांत सांगितलेल्या करारांची व्याख्या तिला लागू पडत नसल्यनें, राजा धनराजगिरजी ह्यांचें संचालकत्व कायम आहे.” प्रतिवादी रामगोपाळ गणपतराय ह्यांचें व अर्जदार वादीचें वांकडें असल्याचाहि न्यायमूर्तींनीं उल्लेख केला.

### दारूवर टेपर ठेवून भागलें नाहीं ?

एका विमेदारानें उतरविलेल्या विम्याची एक अट अशी होती कीं विमेदार जर दारू पिण्यापासून स्वतःची कांहीं नुकसानी करून घेईल तर कंपनी त्या नुकसानीस जबाबदार असणार नाहीं. पुढें मोटारचा अपघात होऊन त्यांत विमेदार स्त्री व तिचा नवरा दोघेहि मृत्यु पावले. नवऱ्याच्या मिळकतीची व्यवस्था पाहणाऱ्या विश्वस्तांनीं बायकोच्या विमा रकमेची मागणी कंपनीकडे केली. कंपनीचें म्हणणें पडलें कीं, अपघातापूर्वी सुमारें ४।५ तास विमेदारानें मद्यमिश्रित पेयाचे एक–दोन पेले घेतलेले होते व म्हणून वरील अटीनुसार कंपनीवर नुकसानीची जबाबदारी येत नाहीं. पुराव्यामध्यें विमेदारानें घेतलेल्या पेयामध्यें मद्यार्काचें प्रमाण काय होतें तें दाखविण्यांत आलें नव्हतें. अपघाताची चौकशी करणाऱ्या पोलिस अंमलदारास दारूचा वास कोठेंच लागला नव्हता आणि वैद्यकीय तपासणींत दारू प्यायल्याचें दिसून आलें नव्हतें. अमेरिकेंतील जॉर्जिया अपेलेट कोर्टानें निकाल दिला कीं मृत्युपूर्वी कांहीं तास मयतानें मद्ययुक्त पेय घेतलें होतें, यावरून अपघाताच्या वेळीं विमेदाराचे पोटांत मद्यार्क होताच असा निर्णय देतां येणार नाहीं. मद्यार्क घेतल्यापासून पोटामध्यें तो किती वेळ राहूं शकतो तत्संबंधीं तज्ज्ञ मत कोर्टापुढें आलेलें नाहीं. अशा वेळीं पंच ( ज्युरी ) मंडळींचाच निकाल कोर्टाला ग्राह्य धरावा लागेल. तो कंपनीचे विरुद्ध असल्याकारणानें कोर्टानें नवऱ्याचे विश्वस्तास विम्याची रक्कम मिळावी असा निर्णय दिला.

**विक्रीकर कायद्यांत दुरुस्ती**—विक्री कर कायद्यांत दुरुस्ती करणारें एक बिल मुंबई प्रांतिक विधिमंडळांत लवकरच मांडण्यांत येणार आहे.


पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.

१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २२७३८








साठे बिस्किटें

युद्धोत्तरकाळीं आम्ही सर्व ग्राहकांची गरज भागवूं शकूं अशी अपेक्षा होती. पण प्रचलित अन्नपरिस्थितिमुळें वाहतुक व पुरवठा याबाबतचीं नियंत्रणें, तसेंच यंत्र-सामुग्रीची हंगामिक उत्पादन-शक्ति, या कारणांमुळें अद्याप पुरवठा अपुरा आहे. म्हणून नुसतें बिस्किटें कमी वापरणें जरूर आहे.

व्यापाऱ्यांनीं स्थानिक स्टॉकिस्टकडे चौकशी करावी







हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत ग. विठ्ठल हरि चवें यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काटे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३, शिवाजीनगर, (डे. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.